## निशाणी क्र. ५ खाली आदेश
## (पारित दि. ३०/०९/२०२२)

वादीने प्रस्तुतचा दावा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ४४७/१, क्षेत्र १८ बाय १९ फुट व उत्तरेकडील १३ फुट बखळ जागा या मिळकतीबाबत निरंतर मनाई हुकूमासाठी दावा दाखल केला असून त्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम मिळणे साठी दाखल केलेला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे आहे**:—

२. दावा मिळकत ग्रामपंचायत घर क्रमांक ४४७/१ व त्याच्या उत्तर बाजूकडील १३ फूट बखळ जागा ही वादीच्या मालकी व ताबे वहिवाटीतील असून त्यास सदर मिळकत दिवाणी दावा क्रमांक ९/२०१४ मधील दि. १३/०७/२०१९ रोजी लोकन्यायालयामध्ये झालेल्या तडजोड हुकूमनाम्याआधारे वाटपात मिळालेली आहे. दावा मिळकतीचा पुर्वीचा ग्रामपंचायत क्रमांक ५५४ असा होता व नवीन नंबर ४४७ असा आहे. दिवाणी दाव्यातील हुकूमनाम्याप्रमाणे वाटप होवून घर क्रमांक ४४७ याचे घर क्रमांक ४४७, ४४७/१ व ४४७/२ असे तीन भाग पडले. दावा मिळकत वादीच्या ताबे वहिवाटीस असून त्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयाने ठराव क्रमांक ५० दि. १२/१०/२०२० रोजी मंजूर करुन वादीच्या नावाची नोंद संमत केलेली आहे.

३. दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूस प्रतिवादीचे ग्रामपंचायत घर क्रमांक ५६६ असून त्याने वादीचे भाउ व त्याची पत्नी सुलोचना यांच्यातील अग्रहक्कावरुन असलेल्या वादाचा फायदा घेवून त्यांच्या दबावापोटी वादीच्या बखळ जागेमध्ये अडी हरकत व त्रास देण्यास सुरवात केली. वादी हा व्यवसायानिमीत्त मुंबई येथे राहत

असून सदर बाबीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी वादीच्या भावाशी हातमिळवणी करुन दावा मिळकतीच्या बखळ जागेमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहे. वादीने दि. १४/१२/२०२० रोजी वकिलामार्फत नोटीस पाठविली. सदर नोटीस मिळून देखील प्रतिवादीचे गैरवर्तन सुरुच आहे. प्रतिवादी वादीला दावा मिळकतीतून बेदखल करुन अतिक्रमण करण्याच्या धमक्या देत आहे व तू बखळ जागेमध्ये दिसलास तर तुला पाहून घेतो, असे धमकावत आहे. त्यामुळे वादीस प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले.

४. प्रतिवादीस दावा समंन्स नि.९ अन्वये प्राप्त होवून देखील तो दाव्यात हजर झाला नाही. त्यामुळे प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश दि. १३/०६/२०२२ रोजी पारीत करण्यात आला.

५. वादीच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाच्या निकालासाठी पुढील मुद्दे उपस्थित होत आहेत. सदरचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणेः—

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. वादीने प्रथमदर्शनी बाजू सिद्ध केली आहे काय? | ..... | होय. |
| २. न्यायाचा तराजु वादीच्या बाजुने आहे काय? | ..... | होय. |
| ३. सदर तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ..... | होय. |
| ४. आदेश काय ? | | अर्ज मंजूर |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत** :—

६. उपरोक्त तिन्हीं मुद्याचे निष्कर्ष एकमेकांवर विसंबुन असल्यामुळे

विवेचनाची पुन्नरावृत्ती टाळण्यासाठी सदर तिन्हीं मुद्यांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहे. वादीने दावा मिळकतीचा नमूना नं. ८, दिवाणी दावा क्रमांक ९/२०१४ मधील हुकूमनाम्याची प्रत तसेच प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत, त्याची पोस्ट पावती व पोहोच पावती दाखल केली असून दाव्यासोबत प्रतिवादी व वादीचे भाउ व वडील यांचे नावाचा नमूना नं. ८ दाखल केला आहे.

७. दिवाणी दावा क्र. ९/२०१४ मधील दि. १३/०७/२०१९ रोजी पारीत करण्यात आलेल्या हूकूमनाम्यानुसार दावा मिळकत वादीच्या हिश्यास दिलेली आहे. त्यानुसार दावा मिळकतीचा नमूना नं. ८ वादीचे नावे नोंदवलेला आहे. दावा मिळकतीच्या नमूना नं. ८ याचे अवलोकन केले असता त्यामध्ये १८ बाय १९ चौ. फू. जागा व उत्तर बाजूने १३ फूट बखळ जागा वादीच्या नावे नोंदविलेली आहे. त्यामुळे वादी दावा मिळकतीचा कायदेशीर ताबेदार असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते.

८. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी दावा मिळकतीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत असून वादीस धमकावत आहे. वादीने प्रतिवादीस वकिलांमार्फत नोटीस पाठविली. सदर नोटीस प्रतिवादीस मिळाल्याबाबत अभिलेखावर पोहोच पावती दाखल आहे. सदर नोटीसला प्रतिवादीने कोणतेही उत्तर दिले नाही.याउलट त्याचे गैरवर्तन सुरुच असल्याचे वादीचे कथन आहे. प्रतिवादीने प्रकरणात हजर होवून वादीचे कथन नाकारलेले नाही. या सर्व बाबींवरुन प्रतिवादी वादीच्या दावा मिळकत व उत्तरेकडील १३ फूट बखळ जागेत कायदेशीर अधिकार नसताना अडी हरकत करीत असल्याचे सिध्द होते.

९. वादी हा मुंबई येथे राहत असून प्रतिवादी विरुध्द मनाई हुकूम पारीत न केल्यास तो वादीच्या दावा मिळकतीवर गैरकायदेशीररित्या अतिक्रमण करुन वादीस

दावा मिळकतीतून बेदखल करु शकतो. त्यामुळे वादीचे हक्कात मनाई हुकूम पारीत करणे अनिवार्य आहे. त्यामुळे वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली असून न्यायाचे तराजू देखील त्याचे बाजूने आहे. मनाई हुकूम पारीत न केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होवू शकते. त्यामुळे मुददा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवतो व मुददा क्र.४ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) वादीचा अर्ज नि. ५ मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादीने वादीच्या दावा मिळकत व उत्तर बाजूकडील १३ फूट बखळ जागेवरील शांततामय ताब्यास दाव्याचा निकाल लागेपर्यंत अडीहरकत करु नये, असा अंतरीम मनाई हुकूम पारीत करण्यात येतो.

BHAGWAN DNYANOBA CHOKHAT
Digitally signed by BHAGWAN DNYANOBA CHOKHAT
Date: 2022.09.30 16:40:53 +0530

दि. ३०.०९.२०२२

(बी. डी. चोखट)
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
घोडेगाव

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shri. A.E. Deshmukh |
| Name of Court | : | Shri. B. D. Chokhat Saheb,<br>Judicial Magistrate First Class,<br>court Ghodegaon. |
| Date of Order | : | 30.09.2022 |
| Date P.O. Signed | : | 30.09.2022 |
| Date of P.D.F. | : | 30.09.2022 |
| Date of Uploading | : | 30.09.2022 |